*लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमीत्त घोषीत 100 कोटी रू. निधी त्वरीत द्यावा – आ. सुधीर मुनगंटीवार*

*मातंग समाज बांधवांच्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी सर्वशक्तीनिशी प्रयत्न करणार*

*लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमीत्त आदरांजली सभा संपन्न*

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमीत्त 100 कोटी रूपयांचा निधी मी अर्थमंत्री असताना जाहीर केला होता. त्याचप्रमाणे अण्णा भाऊंच्या प्रेरणादायी स्मृती जपण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून टपाल तिकीटाचे प्रकाशनही आम्ही केले होते. अण्णा भाऊ साठे वंचितांचा आवाज होते. 'ये आजादी झूठी है, देश की जनता भूखी है' असे ठासून सांगणा-या अण्णा भाऊंनी सभोवताली पसरलेले अफाट दुःख, दारिद्रय, अज्ञान याबाबत चिंतन करून ते साहित्यात प्रतिबिंबीत केले. 'पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नसून श्रमीकाच्या तळहातावर आहे' असे सांगणा-या अण्णा भाऊंनी मानवतावाद जपत साहित्य सेवा केली व शोषीत, पिडीतांच्या कल्याणासाठी आपले अवघे आयुष्य खर्ची घातले. पराक्रमी, सात्विक असलेल्या मातंग समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकासासाठी लोकप्रतिनिधी म्हणून मी कायम माझे योगदान देईल, असे प्रतिपादन माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

दिनांक 18 जुलै रोजी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या पुण्यतिथी दिनानिमीत्त वेबेक्स द्वारे आयोजित आदरांजली सभेत आ. सुधीर मुनगंटीवार बोलत होते. भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव अमित गोरखे यांनी या आदरांजली सभेचे आयोजन केले होते. यावेळी बोलताना आ. मुनगंटीवार पुढे म्हणाले, 2001 मध्ये मातंग समाजाच्या विविध मागण्यांसाठी मुंबईच्या आझाद मैदानात आंदोलन सुरू होते. आमदार म्हणून मी त्याठिकाणी भेट दिली. मातंग समाजाच्या विविध मागण्यांबाबत मी विधानसभेत अर्धा तास चर्चा उपस्थित केली. माझ्या मागणीच्या अनुषंगाने क्रांतीवीर लहूजी साळवे मातंग समाज आयोगाची स्थापना सरकारने केली. आयोगाने सरकारला मागण्यांबाबत काही शिफारशी केल्या. त्यातील काही मागण्यांवर निर्णयही झाले. आजही मातंग समाजाच्या मागण्यांची सोडवणूक करण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून विधानसभेच्या माध्यमातुन विविध संसदीय आयुधांचा वापर करत संघर्ष करेन. लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमीत्त जो 100 कोटी रूपयांचा निधी अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आला आहे तो राज्य सरकारने त्वरीत वितरीत करावा यासाठी मी राज्य सरकारकडे पाठपुरावा करीत आहे. वंचित, शोषीतांच्या कल्याणासाठी आपले अवघे आयुष्य खर्ची घालणा-या अण्णा भाऊंचा यशोचित सन्मान व्हावा यासाठी मी प्रयत्नांची शर्थ करेन. अण्णा भाऊंना भारतरत्न या उपाधीने सन्मानित करावे, अण्णा भाऊंचे स्मारक, क्रांतीवीर लहूजी साळवे यांचे स्मारक आदी मागण्यांचा मी लोकप्रतिनिधी म्हणून पाठपुरावा करेन अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलताना दिली.

आदरांजली सभेचे प्रास्ताविक भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव अमित गोरखे यांनी केले तर आभार प्रदर्शन माजी आमदार सुधाकरराव भालेराव यांनी केले. सभेला आ. सुनिल कांबळे, आ. नामदेव ससाणे, मधुकरकराव कांबळे, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, नितीन दिनकर आदींसह राज्यातील मातंग समाजातील मान्यवरांची उपस्थिती होती.

सुधीर स. मुनगंटीवार
विधानसभा सदस्य
माजी कॅबिनेट मंत्री (महाराष्ट्र)

जा.क्र. २४५४/जुलै/२०२०
दिनांक : १८.७.२०२०

प्रती,

मा. ना. उध्दवजी ठाकरे
मुख्यमंत्री
महाराष्ट्र शासन, मंत्रालय
मुंबई-३२

सप्रेम नमस्कार,

विषय: लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमीत्त घोषीत १०० कोटी रू. निधी त्वरीत वितरीत करण्याबाबत.

महोदय,

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमीत्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याकरिता १०० कोटी रू. निधी उपलब्ध करण्याचे सन २०१९-२० चा अतिरिक्त अर्थसंकल्प विधीमंडळाला सादर करताना जाहीर करण्यात आले होते, मात्र अद्याप हा १०० कोटी रू. निधी उपलब्ध करण्यात आलेला नाही. सदर निधी वितरीत उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे.

आपल्या साहित्यातुन दीन, दुर्बल, शोषित, पिडीत, उपेक्षित, वंचितांच्या दु:खाला वाचा फोडणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमीत्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी १०० कोटी रू. निधी उपलब्ध करण्याचे अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आले होते, मात्र अद्याप हा निधी उपलब्ध झालेला नाही. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमीत्त आम्ही त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ टपाल तिकीट प्रकाशित केले होते.

अण्णाभाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम या चळवळीमध्ये शाहीरीच्या माध्यमातुन महत्वपूर्ण योगदान दिले आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकीय व सामाजिक प्रश्नांविषयी त्यांनी मोठी जागृती निर्माण केली. कष्टकऱ्यांच्या

गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी : (कार्या.) ०७१७२-२५२५८२,
फॅक्स : ०७१७२ - २५८८००, ७७२२०७४१९९, अजय धवने स्वीय सहा. ९८२२५६५९२६,
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in, ajayd852@gmail.com, bjpchandrapur@gmail.com 9552799608

सुधीर स. मुनगंटीवार
विधानसभा सदस्य
माजी कॅबिनेट मंत्री (महाराष्ट्र)

प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्यांनी आपले अवघे आयुष्य खर्ची घातले. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमीत्त विविध कार्यक्रम आयोजित करणे अपेक्षीत असताना व यासाठी निधीची घोषणा झाली असताना विद्यमान सरकारने हा निधी उपलब्ध करून दिलेला नाही. ज्या मातंग समाजाचे प्रतिनिधीत्व अण्णाभाऊ साठे यांनी केले तो मातंग समाज आजही सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक या आघाडयांवर दुर्लक्षीत व मागास आहे. मातंग समाजाच्या विविध मागण्या शासन दरबारी प्रलंबित आहे. मातंग समाजाच्या मागण्यांची प्रधान्याने पूर्तता करत राज्य शासनाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमीत्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी जो निधी घोषीत केला आहे तो त्वरीत वितरीत करावा व या थोर समाजसुधारकाला आदरांजली द्यावी, अशी आपणास विनंती आहे.

कार्यवाहीची सविस्तर रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

१. श्री. अमीतजी गोरखे, सचिव भाजपा महाराष्ट्र
२. आ. सुनिलजी कांबळे,
३. आ. नामदेवराव ससाणे
४. श्री. मधुकरराव कांबळे
५. प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, माजी मंत्री
६. श्री. सुधाकरराव भालेराव, माजी आमदार

गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी : (कार्या.) ०७१७२-२५२५८२,
फॅक्स : ०७१७२ - २५८८००, ७७२२०७४१९९, अजय घवने स्वीय सहा. ९८२२५६५९२६,
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in, ajayd852@gmail.com, bjpchandrapur@gmail.com 9552799608